ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume–X, Issues–I Jan-Feb 2021

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास

डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे
*सहाय्यक प्राध्यापक*
*आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,*
*शिरपूर, जि. धुळे*

डॉ. तुषार मधुकर माळी
*सहाय्यक प्राध्यापक*
*आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,*
*शिरपूर, जि. धुळे*

*सारांश : प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास सर्वेक्षण संशोधन पध्दतीने करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी सहेतूक नमुना निवड पध्दतीने एकूण ९० विद्यार्थी शिक्षकांची निवड करण्यात आली होती. प्रस्तुत संशोधनात शालेय प्रशासनासंदर्भात विद्यार्थी शिक्षकांमधील जाणीव जागृतीचे मापनकरण्यासाठी संशोधकांच्या स्वनिर्मित शोधिकेचा वापर करण्यात आला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता. विद्यार्थी शिक्षकांमध्ये विद्यार्थींनी शिक्षकांपेक्षा शालेय प्रशासन संदर्भात जाणीव जागृती अधिक दिसून येते. ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षकांमध्ये शालेय प्रशासन संदर्भात जाणीव जागृती सारखीच दिसून येते. भाषा, विज्ञान व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृती सारखीच दिसून येते.*

CC BY

*Aarhat Publication & Aarhat Journals*is licensed Based on a work at*http://www.aarhat.com/eiirj/*

**प्रस्तावना:** शालेय प्रशासन हा शळांशी संबंधित एक मुख्य भाग असतो. मुख्याध्यापकास तो अत्यंत काळजीपूर्वक आणि लोकशाही पध्दतीने राबवायचा असतो. लोकशाही हा शालेय प्रशासनाचा मुख्य गाभा मानला जातो. नियोजन करणे, नियोजनाची अमंलबजावणी करणे. शाळेशी संबंधित सर्व मानवी घटकांच्या क्षमता, पात्रता, अनुभव, विचार, गरजा आणि मतांचा योग्य अर्थ लावून कामकाजाची दिशा निश्चित करणे. आपल्याकडे असलेल्या अधिकाराचा योग्य वापर करणे. आपल्या कामाची विभागणी करणे. या सर्व गोष्टीं शालेय प्रशासनाशी संबंधित आहे. त्यात प्रभावीपणा आल्यास शाळेचा दर्जा गुणवत्तेकडे जातो. योग्य गुणवत्ता असलेली शाळा सक्षम आणि प्रभावशाली नागरिक निर्माण करुन देशाच्या विकासासाठी हातभार लावत असतात. मुख्याध्यापक हा घटक प्रमुख असला तरी त्याला इतरांचे विचार घेणे महत्त्वाचे असते. प्रत्येकास आपला विचार मांडण्याची संधी देणे. स्व हिताचा विचार न करता प्रत्येकास समान संधी प्राप्त करुन देणे हेच मुख्याध्यापकाचे कार्य आहे. ग्रामीण वा शहरी विभागातील शाळा असो प्रत्येक शाळेत दर्जेदार शिक्षण देणे अतिशय महत्त्वाचे आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मुख्याध्यापकाच्या भूमिका बदलल्या आहेत त्यानूसार त्यांना आपल्या प्रशासनातही बदल करणे गरजेचे ठरले आहे. त्याचबरोबर समाजाशी आपल्या शाळेचे नाते कसे पक्के करता येईल

ISSN-2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-I Jan-Feb 2021

समाजाने शाळेत यावे आणि शाळेने समाजात जावे ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास घडून येईल. हा विचारही या प्रशासनाचाच एक भाग आहे. आपल्या शाळेतील विद्यार्थी भावी जीवनात चांगले उच्चशिक्षण कसे घेईल यासाठी आजच तयारी करणे. ज्यामुळे विद्यार्थी योग्य शिक्षण घेवुन भविष्यात स्वत:साठी आणि समाजासाठी काहीतरी करु शकतो हा विचार येथे प्रमुख आहे.

वरील विवेचन हे शालेय प्रशासनाशी संबंधित आहे. शालेय प्रशासनाचे चांगले ज्ञान शिक्षकांना असणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर हे ज्ञान भावी शिक्षकांनाही असणे महत्त्वाचे आहे. त्यांनाही हे ज्ञान आपल्या पुढील व्यावसायिक आयुष्यात उपयोगी पडणार आहे. तेच भावी आयुष्यातील शालेय प्रशासन होणार आहेत. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**समस्याविधान:** शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.

**उद्दिष्ट:** शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. विद्यार्थी व विद्यार्थीनी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
२. ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
३. भाषा व विज्ञान अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
४. भाषा व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
५. विज्ञान व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**संशोधन पध्दती** :शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा वर्तमानाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला होता.

**जनसंख्या:** प्रस्तुत संशोधनासाठी शिरपूर तालुक्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती.

**न्यादर्श:** प्रस्तुत संशोधनासाठी सहेतूक नमुना निवड पध्दतीने एकूण ९० विद्यार्थी शिक्षकांची निवड करण्यात आली होती. (विद्यार्थी ४५+ विद्यार्थीनी ४५=९०) (ग्रामीण ३०+ शहरी ६०=९०) (भाषा ३० + विज्ञान ३०+ सामाजिक शास्त्र ३०=९०)

**संशोधनाची साधने:** प्रस्तुत संशोधनात शालेय प्रशासनासंदर्भात विद्यार्थी शिक्षकांमधील जाणीव जागृतीचे मापनकरण्यासाठी संशोधकांच्या स्वनिर्मित शोधिकेचा वापर करण्यात आला होता. यात एकूण २० विधाने होती. प्रतिसाद देण्यासाठी सहमत, असहमत आणि सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. ही शोधिका धोरण निश्चित करणे, कामाची विभागणी, सुयोग्य व्यवस्थापन, प्रोत्साहन व प्रेरणा, लोकशाही पध्दतीचा वापर, कार्याचे मूल्यमापन या घटकांवर आधारित होती. प्रस्तुत शोधिका ही शिक्षण क्षेत्रातील संशोधन मार्गदर्शकांकडून तपासून घेण्यात आली होती.

**संख्याशास्त्रीय परिमाणे:** संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमणांचा अवलंब करण्यात आला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:** प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी शिक्षकांनी संशोधकांच्या स्वनिर्मित शालेय प्रशासन जाणीव जागृती शोधिकेला दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करुन परिकल्पना परीक्षण पुढीलप्रमाणे केले आहे:


| विद्यार्थी | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | सारणी 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी शिक्षक | ४५ | ३३.४८ | ५.७४ | २.०० | ३.६१ | त्याग |
| विद्यार्थीनी शिक्षिका | ४५ | २९.१५ | ५.६३ | | | |
| ग्रामीण विद्यार्थी शिक्षक | ३० | ३०.१४ | ५.४१ | | २.९६ | त्याग |
| शहरी विद्यार्थी शिक्षक | ६० | ३३.७६ | ५.५६ | | | |
| भाषा अध्यापन पध्दती | ३० | ३१.७८ | ५.८७ | | ०.७९ | स्वीकार |
| विज्ञान अध्यापन पध्दती | ३० | ३२.९८ | ५.७६ | | | |
| भाषा अध्यापन पध्दती | ३० | ३१.७८ | ५.८७ | | ०.३७ | स्वीकार |
| सा.शास्त्र अध्यापन पध्दती | ३० | ३२.३४ | ५.६१ | | | |
| विज्ञान अध्यापन पध्दती | ३० | ३२.९८ | ५.७६ | | ०.४३ | स्वीकार |
| सा.शास्त्र अध्यापन पध्दती | ३० | ३२.३४ | ५.६१ | | | |

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume–X, Issues–I Jan-Feb 2021




## विश्लेषण व अर्थनिर्वचन:

- **परिकल्पना ०१:** स्वाधीनता मात्रा (८८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त 't' मूल्य ३.६१ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, विद्यार्थी व विद्यार्थीनी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. विद्यार्थी शिक्षकांचा मध्यमान गुणांक (३३.४८) हा विद्यार्थीनी शिक्षिकांमधील मध्यमान गुणांकांपेक्षा (२९.१५) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, विद्यार्थी शिक्षकांमध्ये विद्यार्थीनी शिक्षकांपेक्षा शालेय प्रशासन संदर्भात जाणीव जागृती अधिक दिसून येते.
- **परिकल्पना ०२:** स्वाधीनता मात्रा (८८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त 't' मूल्य २.९६ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. शहरी विद्यार्थी शिक्षकांचा मध्यमान गुणांक (३३.७६) हा ग्रामीण विद्यार्थी शिक्षकांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (३०.१४) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण विद़्यार्थी शिक्षकांपेक्षा शहरी विद्यार्थी शिक्षकांमध्ये शालेय प्रशासन संदर्भात जाणीव जागृती अधिक दिसून येते.
- **परिकल्पना ०३:** स्वाधीनता मात्रा (५८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त 't' मूल्य ०.७९ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, भाषा व विज्ञान अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात

सार्थ फरक आढळून येत नाही. दोन्ही मध्यमानातील फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे दिसून येते की, भाषा व विज्ञान अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृती सारखीच दिसून येते.

- **परिकल्पना ०४:** स्वाधीनता मात्रा (५८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त 't' मूल्य ०.३७ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, भाषा व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही. दोन्ही मध्यमानातील फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे दिसून येते की, भाषा व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृती सारखीच दिसून येते.
- **परिकल्पना ०५:** स्वाधीनता मात्रा (५८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त 't' मूल्य ०.४३ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, विज्ञान व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही. दोन्ही मध्यमानातील फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे दिसून येते की, विज्ञान व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृती सारखीच दिसून येते.

**निष्कर्षावर आधारित चर्चा :**

प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास करण्यात आला होता. विद्यार्थी शिक्षकांमध्ये विद्यार्थीनी शिक्षकांपेक्षा शालेय प्रशासन संदर्भात जाणीव जागृती अधिक दिसून येते. ग्रामीण व शहरी विद्यार्थी शिक्षकांमध्ये शालेय प्रशासन संदर्भात जाणीव जागृती सारखीच दिसून येते. भाषा, विज्ञान व सामाजिक शास्त्र अध्यापन पध्दती विद्यार्थी शिक्षकांमधील शालेय प्रशासन संदर्भातील जाणीव जागृती सारखीच दिसून येते. शालेय प्रशासन ही शाळेतील महत्त्वपूर्ण बाब मानली जाते. शाळेची यशस्वीता त्यावर अवंलबून असते. म्हणूनच शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये या विषयावर अधिक जोर दिला जातो. विद्यार्थी शिक्षक पुढे शाळेचे नेतृत्व करणार असतात त्यामुळे त्यांना योग्य पध्दतीने शालेय प्रशासन हा घटक समजला पाहिजे. यासाठी या विद्यार्थ्यांचे उदबोधन होणे गरजेचे आहे. विद्यार्थी शिक्षकांनीही या संदर्भात आंतरवासिता, तसेच सेमीनार, परिषद व कार्यशाळा सहभाग नोंदविला पाहिजे. आपल्या गावातील किंवा घराजवळील शाळांना भेटी देवून यासंदर्भात योग्य ती माहिती घेतली पाहिजे.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

*Volume-X, Issues-I* *Jan-Feb 2021*

## संदर्भग्रंथसूची

१. Kothari, C.R. (1990) *Research Methodology, Methods and Techniques.* New Delhi: Wiley Eastern Limited.

२. Kumar, Ranjit. (2011). *Research Methodology a step by step guide for beginners* (3rd Ed). New Delhi: Sage Publication.

३. कदम चा. प. (१९९७). शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणे: विद्या प्रकाशन.

४. पंडित, ब.बी. (२००५). शिक्षणातील संशोधन. पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

५. मुळे आणि उमाठे. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. नागपूर: महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ.

६. मुख्याध्यापक मार्गदर्शिका (२०१२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे—३०